# महाऊर्जास पदनिर्देशित संस्था म्हणुन ऊर्जा संवर्धनासाठी राष्ट्रीय पुरस्कार आणि देशात दुसरे स्थान




महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या महाराष्ट्र शासनाच्या संस्थेस ऊर्जा दक्षता ब्युरो, भारत सरकार विद्युत मंत्रालय यांच्या मार्फत आयोजित "National Energy Conservation Award - 2023" मध्ये दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. ऊर्जा संवर्धन क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकार कडुन राष्ट्रीय पातळीवर हा पुरस्कार देण्यात येतो. सदर पुरस्काराचे वितरण विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे ऊर्जा संवर्धन दिनाचे औचित्य साधुन दि.१४ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या एका विशेष कार्यक्रमात मा. श्रीमती द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती यांच्या शुभहस्ते डॉ. श्रीमती कादंबरी बलकवडे, भा.प्र.से. महासंचालक, महाऊर्जा यांना करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने ऊर्जा संवर्धन अधिनियम २००१ च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या संस्थेस पदनिर्देशित संस्था म्हणुन अधिसूचित केले आहे. ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा कार्यक्षमतेशी संबंधित उपक्रमांची अंमलबजावणी करण्यामध्ये महाऊर्जा आघाडीवर आहे.

डॉ. श्रीमती कादंबरी बलकवडे, महासंचालक, महाऊर्जा यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री. पंकज तगलपल्लेवार अतिरीक्त महासंचालक, महाऊर्जा यांच्या नेतृत्वाखाली राज्यामध्ये विविध क्षेत्रांना ऊर्जा संवर्धन व ऊर्जा बचत कार्यक्रमाअंतर्गत प्रोत्साहन देण्यात येत आहे.